RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# पंचम पुरुषार्थ भक्ती

**सौ.माधवी श्रीपाद जोशी**
एफ –1 'साईपुष्प' अपार्टमेंट,
वखारभाग,रॉकेल लाईन, सांगली

हिंदू धर्मात मानवी जीवनातील धर्म, अर्थ काम व मोक्ष या चार पुरुषार्थांपैकी मोक्ष हे अंतिम लक्ष्य आहे. हा मोक्ष एका जन्मात मिळविता येत नाही तर अनेक जन्मांच्या पुण्यसंचयामुळे मिळतो. प्रत्येक मानवाला मोक्षाप्रत जाण्यासाठी हिंदू धर्माने विविध मार्ग सांगितले आहेत. त्यापैकी प्रमुख चार म्हणजे कर्मयोग,, भक्तियोग,राजयोग, ज्ञानयोग होत. हे चारही मार्ग आपापल्या परीने श्रेष्ठच आहेत परंतु भक्तिमार्गात जी गोडी आहे ती अन्य मार्गात नाही. अन्यमार्ग प्रामुख्याने बुध्दीवर आधारलेले असल्याने समजण्यास ,पटण्यास व आचारण्यास कठीण आहे. म्हणूनच भक्तीचे सुलभत्व जाणून सर्व संतानीही भक्तीला षिरोधार्य केले आहे. अडाण्यातल्या अडाणी माणसालाही आचरता यावा असा तो विलक्षण सुंदर आहे.

भारतात भक्तिमार्ग वेदकाळापासून चालू होता. श्रवणकीर्तनादी नवविध भक्तीची बीजे वेदात सापडतात.

**प्रविष्णुरस्तु तवस्तवीयान् ।**[1]

ऋग्वेदात देवतांची स्तुती आढळते त्या स्तुतीमध्ये देवतांविषयीचा प्रेमभाव अत्यंत कोमल व हृदयंगम असा दिसतो. स्तुती करताना ऋषीनी त्या त्या देवतेषी माता, पिता, बंधू, मित्र इ.नाती जोडलेली दिसतात.

**अभिख्या नो मधवन् नाधमानान् सखे बोधि वसुपते सखीनाम् ।**[2]

अर्थात हे मधव्या (सख्या) तूझी याचना करणारे जे आम्ही, त्या आम्हा तुझ्या सख्याकडे जरा नीट नजर टाक व आमची दखल घे.

**त्वं जामिर्जनानामग्ने मित्रो असि प्रियः ।**
**सखा सखिभ्यः ईड्यः ।।**[3]

अर्थात हे अग्ने , तू लोकांच्या जवळचा नातलग व प्रिय मित्र आहेस, तुझ्याषी सख्य ठेवणारांचा तू स्तवन करण्यास योग्य आहेस.

**यस्य प्रियासः सख्ये स्याम ।**[4]

अर्थात याच्याषी आमचे सख्य असून आम्ही याला प्रिय व्हावे.

अषा प्रकारे ऋग्वेदकाळात इतर नात्याबरोबर मित्रत्वाचे नाते परमात्म्याषी अधिक जोडलेले दिसते हे नाते हृदयात प्रेम,भक्ती असल्याषिवाय स्पष्ट होणार नाही अर्थात. ऋषींची ही स्तुती भक्तीचीच द्योतक ठरते.
'भक्ती ' हा शब्द प्रथम ष्वेताष्वतर उपनिषदात आढळतो.

**यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ ।**
**तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाषन्ते महात्मनः ।।**[5]

अर्थात ज्याची देवाच्या ठिकाणी श्रेष्ठ भक्ती असते व जषी देवाविषयी तषी गुरुविषयीही असते त्या महात्म्याला ह्या सांगितलेल्या गोष्टींचे यथार्थ ज्ञान होते.

परमेष्वराच्या कृपेनेच त्याचे दर्षन होते अषा अर्थाचा एक श्लोक मुण्डकोपनिषदात आला आहे.

**तमक्रतुः पश्यति वीतषोको ।**
**धातु प्रसादान्महिमानमात्मनः ।।**[6]

अर्थात निष्काम साधक ईष्वराच्या कृपेनेच त्याचे दर्षन घेऊ शकतो. त्याचे दर्षन झाल्यावर साधकाच्या ठिकाणी सर्वज्ञतादिक महिम्याचा अविर्भाव होतो व शोकमुक्त तो पैलतीराला जातो.

ब्राह्मणयुगात उपासनेच्या क्षेत्रामध्ये भक्तीचे संकेत आढळतात. शतपथब्राह्मणात ज्ञान व उपासना दोन्ही मार्गाची सामग्री उपलब्ध होते. गोपथब्राह्मणात तर भक्तीला ज्ञानाचा रस मानले आहे तर आरण्यकातून भक्तियोगाची काही तत्त्वे प्रविष्ट झाली आहेत. उपनिषदे जरी ज्ञानाला प्राधान्य देणारी असली तरी त्यात भक्तिची थोरवी कधी गुप्तपणे तर कधी उघडपणे गायलेली दिसते. कठोपनिषदात भक्तिमार्ग दाखल झाला आहे. भागवतात तर भगवंताच्या प्रसादाला पोषण असे म्हटले आहे. वल्लभचार्यांनी हा पोषणसिध्दांत आपल्या भक्तिमार्गाचा प्रधान सिध्दांत बनवला आहे. वेद व उपनिषदे यामध्ये आढळणाऱ्या तुरळक भक्तिकल्पनांना गीतेने विषाल तत्वज्ञानाचे

स्वरुप दिले आहे. तर ज्ञानदेवांनी भक्तिला 'पंचम पुरुषार्थ' असे म्हटले आहे. अषाप्रकारे भक्तिमार्गाची परंपरा चालत आलेली असून या भक्तिच्या विविध आचार्यांनी केलेल्या व्याख्या येथे नमूद करत आहे.

**भक्तीची व्याख्या**

भक्तीचे माहात्म्य स्पष्ट करुन कथन करणारे अनेक आचार्य, कवी भारतात होऊन गेले. त्यापैकी शांडिल्य,नारद, व्यास,षंकराचार्य इ. आदरणीय आचार्यांनी केलेल्या भक्तीच्या व्याख्यांवरुन भक्तीचा अर्थ सार्थ प्रतीत होतो.

**शांडिल्य**

**सा परानुरक्तिः ईष्वरे ।**[7]

ईष्वराच्या ठिकाणी पराकाष्ठेचा अनुराग म्हणजे भक्ती होय.

**भक्तिपीठाचे आचार्य नारद**

**सा त्वस्मिन् परमप्रेमरुपा ।**[8]

परमात्म्याच्या ठिकाणी नितांत प्रेम असणे म्हणजे भक्ती होय.

**भागवतपुराण**

**स वै पुंसां परो धर्मो यतो भक्तिरधोक्षजे ।**
**अहैतुक्यप्रतिहता ययाऽऽत्मा सम्प्रसीदति ।।**[9]

अर्थात भगवान श्रीकृष्णाच्या ठिकाणी भक्ती असणे हा मानवाचा सर्वश्रेष्ठ धर्म आहे. ही भक्ति कामरहित व निरंतर असावी. अषा भक्तिने भक्ताला भगवंताची प्राप्ती होते.

**श्री मधुसूदन सरस्वती**

**यद्भक्तिं न विना मुक्तिर्यः सेव्यः सर्वयोगिनाम् ।**
**तं वन्दे परमान्दधन श्रीनन्दनन्दनम् ।।**[10]

ज्याच्या भक्तिषिवाय मुक्ति नाही, जो सर्व योग्यांचे उपास्य दैवत आहे, त्या परमानन्द स्वरुप नन्दनन्दनाला मी वंदन करतो.

**श्रीधर**

शास्त्रातील अव्यक्त,अक्षर ब्रह्माच्या उपासनेचा जो मार्ग सांगितला आहे, तो दुःखरुप ,कष्टकर व अनेक विघ्नांनी युक्त आहे. परंतू भगवान श्रीकृष्णांच्या चरणकमलरुप भक्तिमार्गाचा जो निर्देष केला आहे, तो सुखरुप सहज असा सन्मार्ग असून सत्पुरुष,संतजन त्याच मार्गाचे अनुसरण करतात. त्यामुळे बुध्दीमान पुरुषाने त्या भक्तिमार्गाचे निरंतर अनुसंधान करणे हेच उचित होय.

**शंकराचार्य**

**मोक्षकारणसामग्रयां भक्तिरेव गरीयसी ।।**[11]

सर्व मोक्षाची जी कारणे त्यात सर्वश्रेष्ठ कारण म्हणजे ज्ञानोत्तर भक्ती म्हणजे स्वरुपानुसंधान म्हणजेच सहजास्थिती असे म्हटले आहे.

**देवी भागवत**

मोक्षप्राप्तीसाठी कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तियोग हे तीन मार्ग विख्यात आहे. या तिन्ही योगामध्ये सहज प्राप्त होणारा भक्तियोगच आहे. कारण भक्तियोगात अन्य मार्गाप्रमाणे देह इत्यादीला पीडा द्यावी लागत नाही.

**महाभारत**

**माहात्म्यज्ञानपूर्वस्तु सुदृढः सर्वतोऽधिकः ।**
**स्नेहो भक्तिरित प्रोक्तस्तया मुक्तिर्न चान्यथा।।**[12]

भगवंताच्या ठिकाणी त्याच्या माहात्म्याचे ज्ञान करुन घेऊन सुदृढ व सतत असा सर्वाधिक स्नेह धारण करणे यालाच भक्ति असे म्हणतात. तिच्यामुळेच मुक्ती प्राप्त होते. अन्य कोणत्याही मार्गाने नाही.

अशा प्रकारे अनेक भक्तश्रेष्ठांनी भक्तीच्या विविध व्याख्याद्वारे भक्तीचे स्वरुप स्पष्ट केले आहे. विस्तारदोष टाळण्यासाठी येथे संक्षेपतः व्याख्यांचा उल्लेख केला आहे. यावरुन एकच निष्चित होते की भगवंतावर निस्सीम प्रेम व्यक्त करुन त्याची कृपा प्राप्त करुन घेणे म्हणजेच भक्ती होय.

**भक्तीचे स्वरुप**

भक्तीमार्गात भक्ती करताना कोणत्या गोष्टींची आवष्यकता असते हे कळल्यास श्रेष्ठ भक्ती आचरणे अधिक सोपे जाते म्हणूनच भक्तीच्या मूळाषी असणारी मूळ तत्त्वे व्यक्त करणे आवष्यक आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**प्रीती व भक्ती**

भक्ताच्या मनात भगवंताविषयी अपार प्रीती व त्याच्याविषयी नितांत भक्ती असणे आवष्यक असते. भागवतातही म्हटले आहे

**या प्रीतिः अस्ति विषयेषु अविवेकभाजाम् ।**
**सा एव अच्युते भवति भक्तिपद अभियेयाः ।।[13]**

अर्थात आपले सर्व विचार व भाव परमेष्वराकडे वळविणे, नश्वरातून अविनाषी सत्तेकडे , दुःख निराषेच्या अंधारातून स्वयंप्रकाषी चैतन्याकडे जाणे हे महान कार्य विषूध्द भक्तीने संपन्न करता येते. म्हणून आपल्या सर्व विचार,विकार,वृत्ती,क्रिया यांचा प्रवाह भगवंताकडे कसा वळवावयाचा याचे शास्त्र व कला म्हणजे भक्तियोग आहे.

परमेष्वराषी संधान साधल्याने मनुष्य शोक ,दुःख चिंतामुक्त होऊन निखळ सुखात अखंडपणे राहील. त्यासाठी ईष्वर चिंतन श्रेष्ठ होय.

ज्ञानदेव आपल्या अमृतानुभव ग्रंथात म्हणतात.

**तैसे सुख असुख । नसोनि जे सुख ।**
**स्वरुपाचे ठायी । स्वरुपेंचि ।।[1]**

म्हणजे जो आनंदनिधान परमात्म्याषी संबंध जोडतो तो आपल्याच ह्रदयात सर्व सुख प्राप्त करुन घेतो. संत तुकारामही म्हणतात

**सुखाचे वोतले । दिसे श्रीमुख चांगले । मने धरिला अभिलाष।**
**मिठी घातली पायास । होता दृष्टादृष्टी । ताप गेला उठाउठी ।।[15]**

**भक्तीची उत्कटता**

भक्ताला भगवंताबद्दल प्रीतिची भावना उत्कट हवी. सर्व अंतःकरण भक्तिभावाने व्यापले गेले पाहिजे. यासाठी परमेष्वराबद्दल भक्ताच्या मनात परम आदर व निस्वार्थी प्रेम, अनुराग असणे आवष्यक आहे. भक्ती प्रेमयुक्त झाल्यावाचून ती उत्कट एकाग्र व स्थिर होऊ शकत नाही आणि श्रीहरीची निष्काम , उत्कट भक्ती सातत्याने वाढत्या प्रमाणात करणे हेच निष्कलंक भक्तीचे द्योतक आहे.

**वासुदेवे भगवति भक्तियोगः प्रयोजितः ।**
**जनयत्याषु वैराग्यं ज्ञानं यद्ब्रह्मदर्षनम् ।।[16]**

अर्थात वासुदेवाच्या ठिकाणी चित्त अतूटपणे जोडले जाणे, त्याच्यावर आसक्त होते हाच श्रेष्ठ भक्तियोग होय. हा साध्य झाल्यास भक्तास सहजच ईष्वरप्राप्ती होते.

अषा उत्कट भक्तीत भक्ताला भगवंतावाचून दुसरे काही आवडेनासे होते. भक्त सर्व जीव एकवटून ईष्वरप्राप्तीसाठी झटतो, तळमळतो, क्षणभरही ईष्वराचे विस्मरण झाल्यास तो कासावीस होतो, व्याकूळ होतो. मग आपल्या इष्टदेवरुपात भक्तास सगुण साक्षात्कार होतो. तेव्हा अप्रत्यक्षपणे भगवत्प्रत्यय त्याला सर्वत्र येऊ लागतो.

**यदा भूतपृथग्भावमेकस्थमनुपष्यति ।**
**तत एव च विस्तारं ब्रह्म सम्पद्यते तदा ।।[17]**

हीच भक्तियोगाच्या दृष्टीने अनन्यभक्ती होय. या अनुभवात भक्त व देव यातील अंतरच लोपते व त्यांची एकरुपता होते.

**अनन्यता**

भक्ती ही अनन्य असावी. **न अन्या इति अनन्या.** अर्थात ज्याच्या ह्रदयात भगवंताषिवाय अन्य कोणीही नाही असा भक्त. ज्याच्या अंतःकरणातील सर्व भाव, विकार, कामना यांचा लोप झाला म्हणजेच अनन्यता होय. आपण सदा सर्वदा परमेष्वराषी जोडले आहोत याची जाणीव होणे होय. भक्ताने आपल्या इष्ट देवाच्या ठिकाणी असा अनन्य भक्तीभाव ठेवणे व विषयचिंतनात गुंतलेले मन ईष्वरचिंतनात गुंतवणे होय.

**मामनुस्मरतष्चित्तं मय्येव प्रविलीयते ।[18]**

अर्थात परमात्म्याच्या अनुसंधानात गुंतलेले मन त्या चैतन्यात लीन होते.

ही अनन्यता साधण्यासाठी योगमार्गात शरीर, प्राण व मन यांना कठोर षिस्तीत राबवूनच अनन्यता साधते. कोणत्याही प्रकारे, शरीर, भावना ,मन व इंद्रियांना भगवंताकडे वळवावयाचे व सर्व वृत्ती, प्रवृत्ती, प्रेरणा यांना प्रेमरुप भक्तीत गुंतवावयाचे असते. भक्ती उत्कट, अनन्य झाल्यावाचून परमेष्वरप्राप्ती होणे शक्य नाही. परमेष्वरप्राप्ती ही अतिदुर्लभ गोष्ट अनन्यभक्तीच्या प्रभावाने सुलभतेने साधते.

**अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यषः ।**

**तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः ।।[19]**

'मी केवळ भगवंताचा व भगवंत माझे आहेत दुसरे कोणी नाही आणि मी दुसऱ्या कुणाचा नाही ' असा भाव भक्ताच्या मनात निर्माण होणे म्हणजेच अनन्यता चित्तात प्राप्त होणे होय. अषा अनन्यचित्त झालेल्या योग्यासाठी मी सुलभ आहे असे भगवान म्हणतात. व अषा अनन्यभक्तीनेच मी प्राप्त केला जाऊ शकतो असे भगवान म्हणतात.

अशा भक्तांबद्दल भगवंत अत्यंत प्रेमाने बोलतो.

**अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।**
**तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।।[20]**

'जे लोक एकनिष्ठेने चिंतन करुन माझी उपासना करतात त्यात सतत योगयुक्त असलेल्या पुरुषांचा सांसारिक नित्याचा उदरनिर्वाह मी चालवतो.'

**मूल्यमापन**

अषाप्रकारे ईष्वर प्राप्तीची जी अनेक साधने सांगितली आहेत, त्यात भक्तिमार्ग हे सर्वश्रेष्ठ साधन आहे ते त्याच्या सुलभतेने आणि सहजतेने. कारण हा भक्तिमार्ग आचरण्याचा अधिकार प्रत्येक जणास असतो. ज्याच्या मनात ईष्वराविषयी दृढ प्रीती आहे, असा दूरात्माही माझी भक्ती करेल तर तो मलाच येवून मिळेल. असे प्रत्यक्ष भगवंताने गीतेत निक्षून सांगितले आहे.

**अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।**
**साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ।।[21]**

सुलभ अषा भक्तिमार्गाच्या 9 प्रकारांमध्ये प्रत्येक भक्ती उत्तरोत्तर श्रेष्ठतम होत गेली आहे. भक्तिचा प्रकार यापैंकी कोणताही असला तरी त्यातील मूळ तत्व भक्तीची ईष्वराबद्दलची ओढ, दृढ प्रीतीची भावना व अढळ विष्वास आहे. भक्ताच्या श्रेष्ठ भक्तीतूनच त्याचे व ईष्वराचे नाते दृढ होते जाते. व तेथेच अन्योन्य भक्ती जन्म घेते.तेथे ईष्वराचे भक्तावरील प्रेम व भक्ताचे ईष्वरावरील प्रेम हे पूर्णतेने प्रत्ययास येते. यांच्यातील हे प्रेमाचे नाते गुरु–षिष्य,ईष्वर–भक्त , माता–पुत्र , पती–पत्नी किंवा निखळ मित्र रुपात असते. या संबंधात भक्त ज्या श्रेष्ठतेने ईष्वराची भक्ती करतो, त्याच दृढतेने तो ईष्वराचे प्रेम व कृपाही प्राप्त करतो. या साऱ्या नात्यातून ईष्वराच्या अनंत कृपेचा प्रत्यय येत असतो.

**संदर्भसूची**

1. ऋग्वेद 7 –100–3
2. तत्रैव 10 –112 – 10
3. तत्रैव 1 –75 –4
4. तत्रैव 4 – 17 – 19
5. श्वेताश्वतेरापनिषद 6 – 23
6. मुण्डकोपनिषद 1–2–20
7. शाण्डिल्थभक्तिसूत्र 2
8. नारदभक्तिसूत्र 2
9. भागवद्पुराण 1–2–6
10. गूढार्थदीपिका 7–2
11. विवेकचूडामणि 32
12. महाभारत तात्पर्यनिर्णय 1–86–107
13. नारदभक्तिसूत्र
14. अमृतानुभव 5–38
15. तुकारामगाथा 1329
16. भागवद्पुराण 3–32–33
17. श्रीमद्भगवद्गीता 13–20
18. भागवद्पुराण 11–14–27
19. श्रीमद्भगवद्गीता 8–14
20. तत्रैव 9–22
21. तत्रैव 9–30